मंगळवार, २६ एप्रिल २०२२

दै. पुढारी

# विवेकानंदमध्ये 'औषध कंपनीमधील करिअर संधी' विषयावर वेबिनार

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयात करिअर गाईडन्स कक्ष व बायोटेक्नॉलॉजी एंटायरतर्फे, ओपेक्स स्किल डेव्हलपमेंट सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने 'औषध कंपनीमधील करिअरच्या संधी' या विषयावर ऑनलाईन वेबिनार झाला. वेबिनारमध्ये ओपेक्स प्रा. लि. कंपनीचे सचिन कुंभोजे यांनी मार्गदर्शन केले. वेबिनारमध्ये यशवंतराव चव्हाण सायन्स कॉलेज, सातारा, फर्ग्युसन कॉलेज पुणे, के. एल. ई. बेळगाव आदी विविध महाविद्यालयातील, बायोटेक्नॉलॉजी, मायक्रोबायोलॉजी विषयाचे विद्यार्थी, प्राध्यापक सहभागी झाले होते. वेबिनारचे आयोजन प्रा. एस. जी. कुलकर्णी व प्रा. समीक्षा फराकटे यांनी केले.

तरुण भारत ■ मंगळवार, २६ एप्रिल २०२२

# ज्ञानेश्वरी पाटीलची खेलो इंडिया नेमबाजी स्पर्धेसाठी निवड

प्रतिनिधी
कोल्हापूर

नुकत्याच झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ नेमबाजी चॅम्पियनशीप स्पर्धेत कोल्हापूरच्या ज्ञानेश्वरी जयवीर पाटील हिने पीप-साईट एअर रायफल प्रकारात सहावा क्रमांक मिळवला. मेरठ येथील स्वामी विवेकानंद सुभारती विद्यापीठात स्पर्धा झाली. या स्पर्धेत तीने सहाव्या क्रमांकाला गवसणी घालण्यासाठी ४१६.८ गुणांची कमाई केली. या गुणांमुळे तिची बेंगळूर येथे लवकरच होणाऱ्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्सअंतर्गत होणाऱ्या नेमबाजी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ज्ञानेश्वरी ही विवेकानंद कॉलेजची विद्यार्थीनी तर जे. बी. कुसाळे शुटींग ॲकॅडमीची नेमबाज आहे. तिला आंतरराष्ट्रीय नेमबाज रमेश कुसाळे, तेजस कुसाळे व संतोष जाधव यांचे मार्गदर्शन लाभत आहे.



मंगळवार, २६ एप्रिल २०२२ MY कोल्हापूर पुढारी

# मनपा शाळांमध्ये ई -लर्निंग उपक्रमास प्रारंभ

## दै. 'पुढारी' प्रयोग सोशल फाऊंडेशन व विवेकानंद महाविद्यालयाचा उपक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मनपाच्या शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही तंत्रज्ञानाधिष्ठित व अद्ययावत शिक्षणाच्या प्रवाहात समाविष्ट करण्याच्या हेतूने दै. 'पुढारी' संचलित प्रयोग सोशल फाऊंडेशन व विवेकानंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने व प्राथमिक शिक्षण समिती, मनपा यांच्या सहकार्यातून ई-लर्निंग उपक्रम ५८ शाळांत राबवण्यात येणार आहे. याचा शुभारंभ कसबा बावडा येथील राजर्षी शाहू विद्यामंदिर, शाळा क्र. ११ येथे मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला.

या उपक्रमांतर्गत इयत्ता ५ वी ते ७ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण दिले जाणार आहे. संगणक ओळख, विंडोज ऑपेरेटिंग सिस्टीम, फाइल्सचे व्यवस्थापन, वर्डपॅड, पेंट, कॅल्क्युलेटर, एक्सेल, इंटरनेट परिचय असा इयत्ता निहाय अभ्यासक्रम निश्चित करण्यात आला आहे. या उपक्रमाचा लाभ चार हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना होणार आहे. 'विवेकानंद'चे डॉ. विशाल वाघमारे, राजश्री पाटील-शेंद्रे यांनी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले.

यावेळी केंद्र मुख्याध्यापक डॉ. अजितकुमार पाटील, उत्तम कुंभार, सुशील जाधव, सुजाता आवटी, तमेजा मुजावर, शिवशंभू गाटे, आसमा तांबोळी, कल्पना मैलारी आदींची उपस्थिती होती.



**कोल्हापूर : कसबा बावडा येथील राजर्षी शाहू विद्यामंदिर येथे ई-लर्निंग उपक्रमात सहभागी विद्यार्थी आणि शिक्षक. (छाया : पप्पू अत्तार)**

### राजर्षी शाहूंच्या माहितीपटाचे सादरीकरण

लोकराजा राजर्षी शाहू महाराजांच्या स्मृतिशताब्दीनिमित्त विद्यार्थ्यांना दै. 'पुढारी'च्या वतीने यू-ट्यूब चॅनेलवर प्रसारित केलेल्या राधानगरी धरण, हत्तीमहाल, साठमारी, दाजीपूर अभयारण्य या ऐतिहासिक स्थळांच्या चित्रफिती आवर्जून दाखवण्यात आल्या. चित्रफीत निर्मिती प्रक्रिया कशा पद्धतीने होते याची तांत्रिक माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.